**पंतप्रधानांनी युनायटेड किंग्डमच्या पंतप्रधानांची घेतली भेट (24 जुलै 2025)**

24 जुलै 2025

23-24 जुलै 2025 दरम्यानच्या औपचारिक युनायटेड किंग्डम भेटीदरम्यान, पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आज युनायटेड किंग्डमचे आदरणीय पंतप्रधान सर कीर स्टार्मर यांची भेट घेतली. बकिंगहॅमशायर स्थित चेकर्स येथील यूके पंतप्रधानांच्या निवासस्थानी आगमन झाल्यावर पंतप्रधान स्टार्मर यांनी अगत्यपूर्ण स्वागत केले. वैयक्तिक दोघांमध्ये तसेच शिष्टमंडळ स्तरीय चर्चा उभय नेत्यांमध्ये पार पडली.

2. उभय पंतप्रधानांनी ऐतिहासिक भारत-ब्रिटन सर्वसमावेशक वित्तीय आणि व्यापार करार (CETA) वरील स्वाक्षरीचं स्वागत केलं. यामुळे व्यापक धोरणात्मक भागीदारी एका नवीन स्तरावर पोहोचेल. त्याचबरोबर उभय अर्थव्यवस्थांमध्ये द्विपक्षीय व्यापार, गुंतवणूक, आर्थिक सहकार्य आणि रोजगार निर्मितीमध्ये लक्षणीय वाढ होईल. उभय बाजूंनी दुहेरी योगदान करारावर वाटाघाटी करण्यासही सहमती दर्शविली आहे. जो CETA सोबत लागू होईल. ज्यामुळे स्पर्धात्मकतेला प्रोत्साहन देऊन आणि व्यावसायिक संस्थांसाठी व्यावसायिक खर्चात कपात करुन उभय देशांमधील व्यावसायिक आणि सेवा उद्योगांना सुविधा प्रदान केली जाईल. भांडवली बाजार आणि वित्तीय सेवांच्या क्षेत्रात वाढत्या सहकार्याची नोंद घेत, पंतप्रधान मोदींनी अधोरेखित केले की उभय देश गुजरातमधील गिफ्ट सिटी, भारतातील पहिले आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र आणि ब्रिटनच्या गतिमान आर्थिक परिसंस्थेमधील अधिक संवाद वाढविण्यासाठी काम करू शकतात.

3. उभय नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांचा संपूर्ण आढावा घेतला आणि भारत-यूके व्हिजन 2035 स्वीकारले. व्हिजन 2035 डॉक्युमेंट हे अर्थव्यवस्था आणि वृद्धी, तंत्रज्ञान, नवोपक्रम, संशोधन आणि शिक्षण, संरक्षण आणि सुरक्षा, हवामान कृती, आरोग्य आणि नागरिक परस्पर संबंध या प्रमुख क्षेत्रांमध्ये पुढील दहा वर्षांसाठी संबंधांचे नेतृत्व करून व्यापक धोरणात्मक भागीदारीमध्ये अधिक महत्त्वाकांक्षा आणि नवीन गती निर्माण करेल.

4. उभय देशांमधील तसेच जागतिक बाजारपेठेतील वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी संरक्षण उत्पादनांच्या सह-डिझाइन, सह-विकास आणि सह-उत्पादनात सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी संरक्षण औद्योगिक आराखड्याला अंतिम रूप देण्याचे उभय नेत्यांनी स्वागत केले. उभय देशांच्या सशस्त्र दलांच्या नियमित सहभागाचे स्वागत करत त्यांनी संरक्षण आणि सुरक्षा भागीदारी मजबूत करण्याबाबत समाधान व्यक्त केले.

5. उभय नेत्यांनी नवीन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानातील वाढत्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले आणि दूरसंचार, महत्वपूर्ण खनिजे, एआय, जैवतंत्रज्ञान आणि आरोग्य तंत्रज्ञान, अर्धवाहक, प्रगत साहित्य आणि क्वांटम यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या तंत्रज्ञान आणि सुरक्षा उपक्रम (TSI) च्या जलद अंमलबजावणीचे आवाहन केले. TSI ला आज एक वर्ष पूर्ण झाले.

6. दोन्ही पंतप्रधानांनी शिक्षण क्षेत्रात भारत आणि यूके मधील वाढत्या भागीदारीचे स्वागत केले. नवीन शिक्षण धोरण (NEP) अंतर्गत भारतात शैक्षणिक संकुल उघडण्यासाठी सहा ब्रिटन विद्यापीठे काम करत आहेत. साऊथहॅम्प्टन विद्यापीठानं गुरगाव याठिकाणी 16 जूलै 2025 रोजी आपलं शैक्षणिक संकुल सुरू केलं आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंतर्गत परदेशी विद्यापीठानं सुरू केलेलं पहिलं शैक्षणिक संकुल आहे.

7. उभय बाजूंनी शैक्षणिक, कला, साहित्य, वैद्यकशास्त्र, विज्ञान, क्रीडा, व्यवसाय आणि राजकारण या क्षेत्रात यूके मधील परदेशस्थ भारतीयांच्या मौल्यवान योगदानाची दखल घेतली. भारत-यूके संबंधांच्या वाढीचा आणि विकासाचा हा चैतन्यदायी सेतू महत्त्वाचा आधारस्तंभ असण्यावर एकमत वर्तविलं.

8. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनतेला दिलेल्या भक्कम पाठिंब्याबद्दल आणि एकजुटीबद्दल पंतप्रधान मोदींनी पंतप्रधान स्टार्मर यांचे आभार मानले. उभय नेत्यांनी दहशतवादाविरुद्धच्या जागतिक लढाईला बळकटी देण्याचे वचन दिले. जहाल मतवाद आणि कट्टरतावाद हे उभय समाजासाठी धोका असल्याचे लक्षात घेऊन, या धोक्याचा सामना करण्यासाठी द्विपक्षीय सहकार्य आणखी वाढविण्यावर त्यांनी सहमती दर्शविली. आर्थिक गुन्हेगार आणि फरार आरोपींना न्याय मिळवून देण्यासाठी पंतप्रधान मोदींनी ब्रिटनचे सहकार्य मागितले.

9. उभय नेत्यांनी परस्पर हिताच्या जागतिक आणि प्रादेशिक मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण केली, ज्यामध्ये इंडो-पॅसिफिक, पश्चिम आशियातील घडामोडी आणि रशिया-युक्रेन संघर्ष यांचा समावेश आहे.

10. पंतप्रधान यांनी पंतप्रधान स्टार्मर यांचे त्यांच्या अगत्यशील आदरातिथ्याबद्दल आभार मानले. त्यांना लवकरात लवकर भारत भेटीचे आमंत्रण दिले.

11. भेटीदरम्यान उभय बाजूंनी खालील कागदपत्रांवर स्वाक्षरी/स्वीकार करण्यात आला.:

- सर्वसमावेशक वित्तीय आणि व्यापार करार [CETA]
- इंडिया-यूके व्हिजन 2035 [Link]
- संरक्षण औद्योगिक आराखडा
- तंत्रज्ञान आणि सुरक्षा उपक्रमावरील निवेदन [Link]
- केंद्रीय अन्वेषण विभाग (भारत) आणि राष्ट्रीय गुन्हे संस्था (यूके) यांदरम्यानचा सामंजस्य करार

**लंडन**

24 जुलै 2025